# भारतीय राज्यघटनेतील तरतुदीं संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**डॉ. निशा सीताराम मोरे**,(सहयोगी प्राध्यापक) श्रीमती. सी. के. गोयल कला व वाणिज्य महाविद्यालय, दापोडी, पुणे.मो. ९७६३९७४१३६

---

प्रस्तावना

इ.स १६०० मध्ये इस्ट इंडिया कंपनीची स्थापना पूर्वेकडील देशात व्यापार करण्याच्या उद्देशाने झाली. इ.स. १७५७ व इ.स. १७६४ च्या युद्धाने कंपनी भारतात राज्यकर्ती बनली. ब्रिटिश सरकारने काही सनदा व कायदे पास करून कंपनीला अधिक प्रबळ बनविले. इ.स. १८५८ साली राणीचे राज्य भारतावर आले. ब्रिटिश सरकारने इ.स. १८६१ तसेच १८९२ च्या कायद्याद्वारे भारतीयांना केंद्रीय आणि प्रांतिक कायदेमंडळातून प्रतिनिधीत्व द्यायला सुरुवात केली. इ.स. १८८५ पर्यंत भारताच्या विविध प्रांतात भारतीयांनी विविध राजकीय संस्थांची सुरूवात केली होती. याचेच रुपांतर सन १८८५ मध्ये राष्ट्रीय महासभा स्थापनेत झाले. राष्ट्रीय महासभेचे ब्रिटिश राज्यकर्त्यांप्रती धोरण मवाळ होते. पुढेचालून राष्ट्रीय महासभेत जहाल तत्वे आली. इ.स. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर मोहनदास करमचंद गांधी उर्फ महात्मा गांधी यांचे भारतीय राजकारणात आगमन झाले. महात्मा गांधीनी १९२० ते १९४७ या काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. या काळात दहशतवादी चळवळीनेही ब्रिटिशांवर चांगलीच दहशत बसविली होती. (१)

इ.स. १९३० नंतर मुस्लिमलीग व तिचे पुढारी बॅरिस्टर मोहम्मद अलि जीना यांनी मुस्लिमांसाठी स्वतंत्र राज्य द्यावे अशी मागणी केली होती. या मागणीचा ब्रिटिशांना चांगलाच फायदा झाला. त्यांनी भारतात फोडा आणि झोडा चे तत्व अवलंबिले. या काळात भारतीयांना एक चांगले प्रशासन व राज्यघटना द्यावी या उद्देशाने ब्रिटिशांनी  इ.स. १९३५ चा भारत प्रशासन कायदा आणला. सन १९३९ पासून दुसरे महायुद्धाला सुरुवात झाली. या युद्धकाळात भारतीयांची मदत व्हावी यासाठी ब्रिटिश सरकारने ऑगस्ट १९४० ला ऑगस्ट ऑफर व सन १९४२ ला क्रिप्स मिशन योजना, सन १९४५ ची वेव्हेल योजना तयार करून भारतीयांना शांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु जीना यांनी प्रत्येक प्रयत्न हाणून पाडलेले दिसून येतात. (२)

जुलै १९४६ मध्ये घटना परिषदेसाठी निवडणूका झाल्या. २५ जुलै १९४६ रोजी या निवडणुकांचा निकाल जाहिर झाला. एकूण जागा - २९६ इतक्या होत्या. त्यापैकी कॉंग्रेस पक्षाला २१२, मुस्लिम लीग या पक्षाला ७३ आणि इतर पक्षांना ११ जागा मिळाल्या होत्या. संस्थानिकांसाठी ९३ जागांसाठी निवडणुका झाल्या नाहीत, त्यांचे प्रतिनिधी नियुक्त झाले. मुस्लिम लीगने घटना समितीवर बहिष्कार टाकला. घटना समितीवर पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद ( नंतर त्यांची घटना समिती अध्यक्ष पदी निवड झाली), वल्लभभाई पटेल, डॉ. राधाकृष्णन, मौलाना आझाद, एक गोपालस्वामी अय्यंगार, कृष्णस्वामीअय्यंगार, टी. टी. कृष्णम्माचारी, के. एम्. मुन्शी, पंडित गोविंद वल्लभ पंत,  जे. बी. कृपलानी, बी. जी. खेर, सी. राजगोपालाचारी, बॅ. जयकर या व्यक्ती कॉंग्रेस पक्षाकडून निवडून आल्या. घटना समितीवर

कॉग्रेसचे प्राबल्य होते. शेड्रूल्डकास्ट फेडरेशन चे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुस्लीम लीगचे महम्मदसादुल्ला, हिंदू महासभेचे नेते डॉ. शामाप्रसाद मुखर्जी, यांचा समावेश होता. महिलाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सरोजनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, दुर्गाबाई देशमुख, हंसा मेहता, रेणुका रे होत्या. त्याच प्रमाणे मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी बेगम रसूल यांचा समावेश होता.

घटना परिषदेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बंगाल प्रांतातून निवडून आले. घटना परिषदेची पहिली बैठक डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे भरली असता सदर बैठकीत डॉ. आंबेडकरांनी घटना परिषदेला सहकार्य करण्याचे जाहिर केले. याच पाश्वभूमीवर भारत स्वतंत्र झाल्यावर कॉग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मुंबई प्रांतातून घटना परिषदेवर निवडून पाठविले. (३)

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या मंत्रिमंडळात कायदामंत्री हे पद दिले. कायदामंत्री या नात्याने ते भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष बनले. त्रिमंत्री योजनेच्या म्हणजे क्रिप्स योजनेच्या तरतुदी नुसार ३८९ सभासदांची एक घटना समिती निर्माण झाली. या घटना समितीत तीन प्रकारचे प्रतिनिधी होते. त्यात ब्रिटिश प्रांताचे २९२, मुख्य कमिशनरच्या प्रांताचे ४३ व संस्थनिकांचे ९३ सदस्य होते.

२९ ऑगस्ट १९४६ रोजी मसुदा समिती स्थापन झाली. मसुदा समितीतचे अध्यक्ष पदी डॉ. बाबासाहेब आंबेडकराची नियुक्ती करण्यात आली. सदर समितीचे अन्य सदस्य कन्हैयालाल मुन्शी, मोहम्मद सादुल्लाह, अल्लादि कृष्णस्वामी अय्यर, गोपाळस्वामीअय्यंगार, एन. माधव राव, टी. टी. कृष्णम्माचारी, हे एकूण सात सदस्य होते. ज्यावेळी मसुदा समितीचे प्रत्यक्षपणे कामकाज सुरू झाले त्या वेळी इतर सात सदस्यांना काही वैय्यक्तिक अडचणी आल्याने त्यांनी राज्यघटनेच्या मसुदा समितीत काम करण्यास असमर्थता दर्शविली. अशा प्रकारे राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी एकट्या आंबेडकरांवर येऊन पडली. त्यांनी अत्यंत यशस्वीरित्या ही जबाबदारी पार पाडली. त्यांनी १४१ दिवसात ३४३ कलमे व १३ परिशिष्टांसह २१ फेब्रुवारी १९४८ रोजी हा मसुदा घटना परिषदेला सादर केला. या संपूर्ण कामकाजा दरम्यान जनतेकडून ७६३५ सूचना आल्या; त्यापैकी २४७३ सूचना चर्चेसाठी स्वीकारण्यात आल्या. (४)

९ डिसेंबर १९४६ पासून २ वर्षे ११ महिने व १७ दिवस इतके घटना समितीचे कामकाज चालले. त्यासाठी ६३ लक्ष ९४ हजार ७२९ रुपये खर्च आला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समिती अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी घटनेच्या विधेयकावर स्वाक्षरी केली त्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजे २६ जानेवारी रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आली. (५) डॉ. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत प्रत्यक्षात अनेक महत्वाच्या तरतुदींचा समावेश केला आहे. त्यातील काही तरतुदींबद्दल मसुदा समिती अध्यक्ष डॉ. आंबेडकरांचे काय विचार होते त्या बद्दल विवेचन पुढील प्रमाणे दिलेले आहे.

भारतीय राज्यघटना जगातील विस्तृत राज्यघटना - भारतीय राज्यघटना जगातील इतर राज्यघटनेच्या तुलनेत आकाराने मोठी आहे. राज्यघटनेत एकूण ३९५ कलमे, १० परिशिष्ट्ये व २२ प्रकरणे आहेत. राज्यघटनेत संघराज्य मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य, राज्याची मार्गदर्शक तत्वे, सार्वजनिक सेवा, मागासलेल्या जाती जमाती, राज्याची अधिकृत भाषा, निवडणूका, अल्पसंख्यांकाच्या हिताचे रक्षण या सर्व बाबींचे विस्ताराने विवेचन केले आहे. राज्यघटना विस्तृत बनली आहे या संदर्भात घटना परिषदेत मसुदा समिती ने मांडलेल्या प्रत्येक तरतुदी संदर्भात सखोल चर्चा होत असे. घटनेच्या मसुद्यावर चर्चेच्या प्रसंगी बी. ए. मंडलोई ( मध्यप्रांत आणि बेरार ), पंडित बाळकृष्ण शर्मा ( संयुक्त प्रांतः सर्वसाधारण) यांनी व इतर काही सदस्यांनी राज्यघटना आकाराने मोठी आहे, बोजड आहे अशा आशयाचे नाराजीच्या सुरात मत मांडले की, कॅनडाच्या राज्यघटनेत १४७ कलमे, ऑस्ट्रेलिया च्या राज्यघटनेत केवळ ४८ कलमे, दक्षिण आफ्रिका १५३, आयरिश राज्यघटना ६३ कलमे, अमेरिका २८, सोव्हिएत संघराज्य १४६ कलमे, स्वीस संघराज्याच्या राज्यघटनेत १२३ कलमे, जर्मन राष्ट्राच्या राज्यघटनेत १८१ कलमे तसेच जपान च्या राज्यघटनेत सर्वसाधारण पणे १०३ कलमे आहेत. (६)

त्यावर भारतीय राज्यघटना आकाराने मोठी बनली आहे; या संदर्भात आंबेडकरांनी ‘ घटना हेतूपूर्वक विस्तृत बनविली आहे’ असे स्पष्टिकरण दिले आहे. या संदर्भात पुढे ते असे म्हणतात की, ज्या देशात लोकशाही परिपक्व स्वरुपात उभी राहिली नाही अशा देशातील राज्यघटनेत सर्व बारिक सारिक गोष्टी सुस्पष्टपणे लिहिणेच योग्य ठरते. घटनेसंदर्भातील प्रश्न केवळ कायदेमंडळावर सोपविणे योग्य नाही. (७)

भारतीय राज्यघटनेचा सरनामा - भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यावर (Preamble) नेहरूंच्या विचारांच्या बरोबरीने डॉ. आंबेडकराच्या विचारांचा प्रभाव होता. पंडित नेहरूनी १३ डिसेंबर १९४६ रोजी घटनेच्या उद्दिष्टांचा ठराव मांडला. सदर ठराव घटना समितीने २२ जानेवारी १९४७ रोजी स्वीकारला. नेहरूंनी मांडलेल्या घटनेच्या उद्दिष्टाच्या ठरावात डॉ. आंबेडकरांनी काही दुरुस्त्यासुचविल्या व त्या मान्य करण्यात आल्या उदा. ‘स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक’ या शब्दांएवजी ‘सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक गणराज्य’ अशी दुरुस्ती करण्यात आली. अशाच प्रकारच्या काही दुरुस्त्याकरुन घटनेचा सरनामा करण्यात आला. (८)

मूलभूत हक्क - भारतीय राज्यघटनेच्या प्रकरण तीन मध्ये मूलभूत हक्कांचे विवेचन केले आहे. मूलभूत हक्कांसदर्भात विवेचन करतांना त्यांच्या मते भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क हे अनियंत्रित नाहीत. राज्यघटनेत मूलभूत हक्कांच्या जोडीला मार्गदर्शक तत्वांची योजना केली आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, ‘मूलभूत हक्क हे प्रत्येक संस्थेला, प्रत्येक अधिकाऱ्याला, बंधनकारक असले पाहिजेत. मूलभूत हक्कांचा भंग ज्यांनी केला आहे त्याला शासन झाले पाहिजे. मूलभूत हक्कांचे स्वरुप व हे हक्क भंग करणाऱ्याला शासन हा कायदा व या कायद्यासंबंधी भारतभर एकच कायदा असला पाहिजे’.

प्रत्यक्षात डॉ. आंबेडकरांचे विचार मूलभूत हक्काच्या तरतुदीमध्ये डोकवतांना दिसतात. राज्यघटनेच्याकलम १२ ते ३५ या कलमांतर्गतमूलभूत हक्काचे विवेचन केले आहे. राज्य या शब्दात संसद, घटकराज्ये, विधिमंडळे तसेच स्थानिक शासने यांचा समावेश होतो. या सर्व यंत्रणांना मूलभूत हक्क नागरिकांना देणे बंधनकारक आहे.

अस्पृश्यता निवारण तरतुदी - भारतातून अस्पृश्यता नष्ट करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुख्य ध्येय होते. मूतभूत हक्क अंतर्गत कलम १७ अनुसार अस्पृश्यता पाळणे हा कायदेशीर गुन्हा मानण्यात आला आहे. यावरुन त्यांनी कलम १७ द्वारे आपल्या उद्दिष्टांची पूर्तता केल्याचे दिसून येते.

संघराज्य - भारताने संघराज्य पद्धतीचा स्वीकार केला आहे. संघराज्य निर्माण करतांना आपण अमेरिकन संघराज्याचा आदर्श समोर ठेऊन भारतीय संघराज्याची निर्मिती केली आहे असे ते म्हणत असत. त्याच्या मते, भारतीय संघराज्य म्हणजे अमेरिकन संघराज्याची नक्कल नव्हे. भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये अमेरिकन संघराज्याच्या वैशिष्ट्यांहून भिन्न आहेत. घटकराज्यांनी संघराज्य निर्माण करतांना भारताची एकता व एकात्मता महत्वाची मानली. भारतीय संघराज्यात काही विशेष लक्षणे आढळतात. उदा. राज्यघटनेत Federal State असा शब्दप्रयोग आढळत नाही; तर राज्यघटनेत Union Of States राज्यांचा संघ असा शब्दप्रयोग आढळतो. Union Of States शब्दप्रयोगामागील भूमिका स्पष्ट करतांना डॉ. आंबेडकर यांचे मत असे होते की, भारत हा मूलतः एकात्म आहे. मुळात एकात्म असलेल्या भारताचे आपण आपल्या सोयीसाठी विभाग करण्यात आले असून प्रत्येक विभागाला घटकराज्याला सरकार प्राप्त झाले आहे. अशा प्रकारच्या भारतीय संघराज्यातून कोणत्याही घटकराज्याला संघराज्याच्या बाहेर पडता येणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.

भारतीय संघराज्यात अधिकारांचे केंद्रीकरण झाले आहे. उदा. संघराज्याला घटकराज्यांपेक्षा अधिक एकूण (९७) विषयांवर कायदा करण्याचा अधिकार राज्यघटनेने दिलेला आहे. एकेरी नागरिकत्व, एकेरीन्यायव्यवस्था, एकेरी राज्यघटना, राज्यपाल केंद्राचा अधिकारी असून त्याने घटकराज्यात राष्ट्रपतींच्या दूताचे काम करणे, घटकराज्याच्यासीमारेषांत बदल करण्याचा अधिकार संसदेला असणे, महालेखापरिक्षक केंद्राचे अधिकारी तसेच निवडणूक आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपतींद्वारा होणे या सर्व तरतुदींमुळे केंद्रसरकार प्रबळ व शक्तीशाली करण्यात आले आहे.(९)

संघराज्याच्या तरतुदींबाबत डॉ. आंबेडकर स्पष्टीकरण देतांना म्हणतात की, 'केंद्रसरकार प्रबळ पाहिजे', I want Center Strong'.भारताच्या घटकराज्यांला स्वतःची स्वतंत्र राज्यघटना बनविण्याचा अधिकार नाही. भारतीय संघराज्याची घटना व घटकराज्याची घटना एकाच तौकटीतबसविल्या असून त्यामधून कोणत्याही घटकराज्यास बाहेर निसटता येणार नाही. संघराज्याच्या या तरतुदी वरून बाबासाहेबांना भारताचे कल्याण अभिप्रेत होते हे स्पष्ट होते. राज्यघटनेच्या माध्यमातून केंद्रसरकारला त्यांनी ' प्रबळ' केले आहे. केंद्रसरकार जर ब्बुत केले

नसते तर आज पंजाब, आसाम, तमिळनाडू, काश्मिर ही राज्येतर भारतातून सहजपणे फुटून बाहेर पडली असती.

डॉ. आंबेडकरांनी प्रबळ कैंद्रसरकारचे महत्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते ‘ ज्यावेळीआणिबाणीची परिस्थिती निर्माण होते त्यावेळी नागरिकांच्या सर्वोच्य निष्ठा घटकराज्याऐवजी केवळ संघराज्याकडे असल्या पाहिजे. कारण सामुहिक ध्येयाकरिता व राष्ट्ररक्षणाकरिता केवळ संघराज्यच कार्य करत असते. म्हणूनच आणिबाणीच्या प्रसंगी उपयोगात आणण्याकरिता कैंद्रसरकारला जादा अधिकार देणे समर्थनिय ठरते. ‘आणिबाणीच्या प्रसंगी घटकराज्यांनी स्वहिता बरोबरीनेच एकूण राष्ट्राचे हित पहावे’. यावरुन राष्ट्राच्या एकतेसाठी व अखंडत्वासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रबळ कैंद्र शासनाची तरतूद केली आहे.

ऐकेरी नागरिकत्व - भारतीय राज्यघटनेत ऐकेरी नागरिकत्वाची तरतूद आहे. सर्वसाधारणपणे संघराज्यातील नागरिकांना दुहेरी स्वरुपाचे नागरिकत्व प्राप्त झालेले असते. परंतु भारताने भारतीय संघराज्यात दुहेरी नागरिकत्व न स्वीकारता ऐकेरी स्वरुपाचे नागरिकत्वाचा समावेश राज्यघटनेतर्ंगत केला आहे. ऐकेरी नागरिकत्वाच्या तरतुदी बाबात डॉ. आंबेडकरांनी आपले विचार पुढील प्रमाण स्पष्ट केले आहेत. डॉ. आंबेडकर या संदर्भात म्हणतात की,‘ भारतात दोन प्रकारची राज्ये आहेत. जरी असे असले तरी घटनेने नागरिकांना नागरिकत्व मात्र एकच प्रदान केले आहे. प्रत्येक नागरिकास नागरिकत्वाचे समान अधिकार आहेत. प्रत्येक व्यक्ती संपूर्ण देशाची नागरिक आहे. घटक राज्यासाठक्षवेगण्या नागरिक्तवची तरतूद भारतात नाही. ऐकेरी नागरिकत्वाच्या तरतुदी मुळे भारत अधिक एकत्म बनेल.

संसदीय लोकशाही - भारतीय संविधानाने संसदीय लोकशाही स्वीकारली आहे. संसदीय शासन पद्धतीमध्ये राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या साह्याने व सल्याने काम करावे लागते. राज्यघटनेच्याकलम ७४ मध्ये तशी तरतूद करण्यात आली आहे. १९७६ मध्ये ४२ वी ऐतिहासिक राज्यघटनादुरुस्ती झाली. ही राज्यघटनादुरुस्ती अत्यंत व्यापक स्वरुपाची होती. म्हणून तिला ऐतिहासिक राज्यघटनादुरुस्ती म्हणता येईल. या घटनादुरुस्तीमुळे राष्ट्रपतींचे स्थान निश्चित झाले आहे. राष्ट्रपतींना पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या सल्यानुसार निर्णय घ्यावे लागतात. ४२ व्या राज्यघटना दुरुस्तीने राष्टपतींचे स्थान अधिकच नामधारी बनले आहे. मंत्रमंडळचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदिय शासन पद्धतीचे तत्वे स्पष्ट केली आहेत -

गुन्हेगार व्यक्तींना मंत्रिमंडळात स्थान देऊ नये. सदर विचार त्यांनी घटना परिषदेसमोर मांडला त्या प्रसंगी ते असे म्हणाले की, ‘ या बाबतीत कायद्याची तरतूद करून फारसा उपयोग होणार नाही. मंत्र्यांनी आपल्या इस्टेटीबाबत निवेदन द्यावे अशी तरतूद असली तरीही त्यातून अनेक पळवाटा शोधल्या जाऊ शकतात. या करिता भ्रष्टाचारी मंत्र्यांविरुद्ध लोकमत तयार करणे आवश्यक आहे. प्रत्येक मंत्र्यावर लोकमताचा अंकुश असणे गरजेचे आहे’.

मार्गदर्शक तत्वे - मार्गदर्शक तत्वे राज्यघटनेच्या प्रकारण चार मध्ये नमूद केली आहेत. कलम ३६ ते ५१ या कलमांतर्गत या तत्वांचा समावेश होतो. मार्गदर्शक तत्वे एकूण १४ आहेत. मार्गदर्शक तत्वांच्या बाबतीत असे दिसून येते की डॉ. आंबेडकरांचा लोकशाही व्यवस्थेवर गाढा विश्वास होता. त्यांचा हा विश्वास राज्यघटनेच्या अनेक तरतुदींतून व्यक्त होतांना दिसतो.

मार्गदर्शक तत्वांच्या बाबतीत त्याचे विवेचन असे आहे की, ' राजकीय लोकशाही स्थापन होण्यासाठी आर्थिक व सामाजिक लोकशाही स्थापन करणे आवश्यक आहे'. आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी मार्गदर्शक तत्वांमध्ये काही महत्वाच्या विषयांचा समावेश केला आहे. उदा. १४ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींना मोफत शिक्षणाची सोय करणे, कामगारांच्या राहणीमानात सुधारणा, समान कामासाठी समान वेतन, ग्रामपंचायतींची स्थापना करणे, दारुबंदी, कुक्कुटपालन व लघुउद्योग स्थापन करणे या आणि यासारख्या सर्व तरतुदींवरुन आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला आहे असे दिसून येते. मार्गदर्शक तत्वांमध्ये अनेक चांगल्या तरतुदी आहेत; परंतु मूलभूत हक्कांप्रमाणे या तत्वांना न्यायालयीन संरक्षण दिलेले नाही. मार्गदर्शक तत्वांना न्यायलयीन संरक्षण का दिले नाही या संदर्भातील प्रश्नाला उत्तर देतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ' जरी ही तत्वे न्यायालयामार्फत अंमलात आणली जात नसली तरी कुठल्याही पक्षाच्या व सरकारची परिमाणे व कारकिर्द मांडण्याची परिमाणे आहेत. दर पाच वर्षांनी भारताचे लोक या परिमाणांवरच अधिकाररूढ पक्षाला पुन्हा निवडून द्यायचे किंवा नाही ते ठरवतील'. या ठिकाणी सत्ताधारी पक्षांना व सरकारला डॉ. आंबेडकरांनी अप्रत्यक्षपणे ही कामे करावी अशा स्वरुपाचा इशारा दिला आहे. (१०)

मागासवर्गीयांसाठी राखीव जागा - भारतीय समाजाला विषमतेची हजारो वर्षांची परंपरा आहे. अशा समाजात केवळ कायदा करून समता प्रस्थापित होणे शक्य नाही. 'विषमतेमुळे जो वर्ग मागास बनला आहे अशा वर्गास समानसंधी देणे उचित नाही. त्याचा फारसा उपयोग त्या समाजाला झाला नसता', असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत. अशा समाजास विशेष संधी देणे आवश्यक होते. या करिता मार्गदर्शक तत्वांमध्ये कलम. ४६ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आणि समाजातील दुर्बल गटांसाठी सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. मागस समाजासाठी राज्यघटनेत विशेष तरतूद करणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. अमेरिकेसारख्या प्रगल्भ लोकशाही राष्ट्राने या तरतुदी संदर्भात भारताचे अनुकरण केले आहे. मूलमूत हक्क संदर्भातील कलम ३२ च्या बाबतीत खुलासा करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ' जर या घटनेतील कुठले कलम असे आहे की ज्या शिवाय ही राज्यघटना शून्यवत होईल असा प्रश्न कुणी विचारला तर या कलमाकडे मी बोट दाखविन. हे कलम म्हणजे राज्यघटनेचा प्राण किंवा आत्मा आहे. (११)

न्यायालयीन पुनर्विलोकन - आपल्या राज्यघटनेत अनुच्छेद १३(२), व अनुच्छेद ३२ मध्ये न्यायालयीन पुनर्विलोकन तरतूद आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन केले आहे. एका चर्चेत काही सदस्यांनी 'राज्यघटना म्हणजे वकिलांचा स्वर्ग आहे' अशा

स्वरुपाचा आक्षेप घेतला व टीका केली होती. सदर टीकेला उत्तर देतांना डॉ. आंबेडकरांनी असे स्पष्टीकरण केले होते की, ' कुठल्या राज्यघटनेच्या अन्वयाबाबत वाद होत नाहीत? जर या राज्यघटनेच्या अन्यवा बाबात न्यायालयासमोर प्रश्न गेले तर त्याबाबत मला मुळीच लाज वाटणार नाही'. शेवटी ते म्हणाले की ' कुठलेही संविधान परिपूर्ण असू शकत नाही. मसुदा समितीतच मसुद्यात सुधारणा करण्यासाठी दुरुस्त्या सुचविण्यात येतात. परंतु प्रांतिक विविमंडळात होणाऱ्या वादविवादातून मला ग्वाही मिळत आहे की, या देशाला स्वतंत्र राष्ट्र म्हणून सुरुवात करण्यास हे संविधान योग्य आहे. हे संविधान वस्तुनिष्ट आहे. लवचिक आहे. देशाची एकता टिकवून ठेवण्याच्या क्षमतेचे आहे. ऐवढे करून जर या संविधानाखाली चुकीच्या गोष्टी घडल्या तर त्याचा अर्थ हे संविधान वाईट आहे असे न ठरता संविधान राबविणाऱ्या माणसांचा तो दुबळेपणा आहे असेच म्हणावे लागेल'. (१२)

सुप्रसिद्ध घटनातज्ञएस्. व्ही पायली यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत मसुदा समितीच्या कार्याबाबत गौरवोद्गार पुढील प्रमाणे काढले आहेत. '' डॉ. आंबेडकरांनी या कामी आपली विद्वत्ता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठ, वकृत्व आणि अनुभव पणास लावले. अतिशय क्लिष्ट प्रकारच्या प्रश्नावर देखील दुर्लभ अशी त्यांची पकड होती. १९३५ च्या कायद्याच्या सखोल बारकाव्याबाबत ज्ञान आहे असे दिसते. घटनेचा मसुदा चर्चिला जात असतांना उद्भवलेल्या कोणत्याही टीकेला ते स्पष्ट आणि सुटसुटीतपणे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या उत्तराने प्रश्नविचारणाऱ्या सदस्यांच्या मनातील गोंधळ, संदेह, संदिग्धता यांचे ढग नाहिसे झाले. तर्कशुद्ध युक्तिवाद, प्रभावी व सर्वांना समजणारे स्पष्टीकरण, कोणत्याही मुद्याला तात्काळ प्रतिवाद करून वाद संपुष्टात आणण्याची हातोटी त्यांच्याशिवाय अन्य कुणाही सदस्यात नव्हती. हे सारे करत असतांनाविरोधकाने एखादा रास्त मुद्दा मांडला तर तो समजून घेऊन स्वीकारण्याचा उदारपणा देखील त्यांच्यात होता. म्हणूनच त्यांना ' आधुनिक मनू ' अथवा ' भारतीय राज्यघटनेचे जनक ' म्हणतात. ते साजेसेच आहे''. (१३)

भारतीय संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात म्हणजे २६ नोंव्हेंबर १९४९ रोजी संविधान मंजूर करतांना जे भाषण केले त्यातून मसुदा समिती संदर्भात त्यांची निवड किती सार्थ होती हेच स्पष्ट होते. डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले की, ''या खुर्चित बसून संविधान सभेच्या कामाचे निरिक्षण मी प्रत्येक दिवशी केले. मसुदा समिती अध्यक्ष व इतर सदस्यांनी अत्यंत आस्थेने व एकाग्र होऊन, उत्साहात मसूदा समितीचे कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या प्रकृतीची तमा न बाळगता हे काम तडीत नेले. मसुदा समितीवर आणि तिच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड करण्याचा जो निर्णय घेतला त्याच्या इतका अचुक निर्णय दुसरा कोणताही घेतला नाही असे मला वाटते. डॉ. आंबेडकर हे राष्ट्राच्या धन्यवादास पात्र आहेत''. (१४)

डॉ. आंबेडकरांचे त्यानंतर मसुदा समितीचे कार्याबद्दल देश विदेशात गौरव झाला. मसुदा समितीचे त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. जगातील एक थोर घटनापंडित म्हणून त्यांचा जगभर किर्तीमान प्रस्थापित केला आहे.

संदर्भ सूचि

१. MansinghSurjit , Historical Dictionary of India , Vision Books, Bombay, 1998. nmZ

Z§. XXV - XXlX

२. कित्ता

३. डॉ. आंबेडकरः घटनाकार, शांताराम शंकर रेगे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ , मुंबई, १९९३, पान. ३३५

४. कित्ता. पृ. ३५६ - ३५७

५. डॉ. शं. ना. नवलगुंदकर, भारतीय राज्यघटनेचे शासन, पृ. ८

६. कळसे आनंद ( संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटनासमिती समोर केलेली भाषणे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, नागपूर, डिसेंबर २०१५, पृ. ७४,७५

७. बाचलवि.मा, गोळवलकरस.म. भारतीय गणराज्य ( शासन आणि राजकारण) घटना आणि तिची वैशिष्ट्ये,

पृ. ४३,४४

८. नवलगुंदरकरशं. ना. भारतीय गणराज्याचे शासन, पृ. २८,२९

९. बाचल वि. मा. गोळवलकरस.म., भारतीय गणराज्यः संघराज्यः प्रत्यक्ष वाटचाल, पृ. १६१

१०. साठे सत्यरंजनपुरुषोत्तम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ (संपा) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, डिसेंबर १९९३. मुंबई. पृ. २७०,२७१

११. कित्ता पृ. २६३.

१२. कित्ता पृ. २६८

१३. कळसे आनंद ( संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटनासमिती समोर केलेली भाषणे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, नागपूर, डिसेंबर २०१५, पृ. ९३,९४,

१४. कित्ता ९४